# महाराष्ट्र नवनिर्माण सेना

## मराठी भाषा दिन
## व
## मराठी भाषा अभिमान सप्ताह

दिनांक २१ ते २७ फेब्रुवारी, २०१०.

# -: मार्गदर्शिका :-

महाराष्ट्र सामाजिक नवनिर्माण अकादमी.

# अनुक्रमणिका

१. प्रस्तावना .................................................. ३

२. हेतू .................................................. ४

३. मार्गदर्शिकेत काय दिले आहे .................................. ४

४. कार्यक्रम-उपक्रम सूची........................................ ५

- सत्कार किंवा गौरव .................................. ५
- प्रदर्शने .............................................. ६
- स्पर्धा .............................................. ७
- महोत्सव .............................................. ७
- अन्य कार्यक्रम-उपक्रम .................................. ८

५. उपक्रम-कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूचना .................. ९

६. मराठी भाषेविषयी अभिमान व्यक्त करणाऱ्या कविता,उद्गार... १०-२१

- संत ज्ञानेश्वरांच्या ओव्या .............................. ११
- स्वातंत्र्यदेवतेची विनवणी : कुसुमाग्रज.................... १२-१३
- मायबोली : सुरेश भट .................................. १४
- इतर .................................................. १५-१९
- ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त रवींद्र केळेकार यांचा भाषेविषयी लेख २०-२१

७. मराठी भाषेतील संकेतस्थळांची सूची ........................ २२

# मराठी भाषा दिन व मराठी भाषा अभिमान सप्ताह

दिनांक २१ ते २७ फेब्रुवारी, २०१०.

## साजरा करण्यासाठी मार्गदर्शिका

---

### प्रस्तावना :

महाराष्ट्रातील ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. आत्तापर्यंत ठरावीक सांस्कृतिक संस्थाच या दिनानिमित्त कार्यक्रम - उपक्रम योजत होत्या. पण मा. राजसाहेब ठाकरे यांच्या सूचनेनुसार आता पक्षाच्या वतीनेही मराठी भाषा दिन व अभिमान सप्ताह साजरा करण्याचे ठरवण्यात आले आहे.

आपल्या पक्षासाठी अर्थातच मराठी भाषा, संस्कृती व अस्मिता हे विषय अधिक महत्त्वाचे आहेत. **आपले (पक्षाचे) पहिले ध्येयच 'महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र प्रदेश आणि मराठी भाषा यांना भौतिक व सांस्कृतिक वैभव प्राप्त करून देणे'**, हे आहे. याचाच अर्थ मराठी भाषेच्या विकासाशी संबंधित उपक्रम-कार्यक्रम-प्रकल्प-उत्सव उच्च दर्जा व गुणवत्तेसह आणि दिमाखदार स्वरूपात आयोजित करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. **यंदाचे वर्ष २००९-२०१० हे महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष** असल्यामुळे असे कार्यक्रम विशेष उत्साहाने व्हायला हवेत. **यासाठीच २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा दिवस म्हणून पक्षाच्या वतीने साजरा करावा, तसेच २१ ते २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा अभिमान सप्ताह' म्हणून उत्साहाने साजरा करावा.**

दिनांक ३ फेब्रुवारी, २०१० रोजी डोंबिवली येथील सभेत बोलताना, खुद्द मा. राजसाहेब ठाकरे यांनी 'मराठी भाषा दिवस व अभिमान सप्ताहा' निमित्त भव्य सोहळे योजावेत असे आवाहन पक्षाच्या कार्यकर्त्यांना केले, याची नोंद घ्यावी.

## हेतू :

- मराठी भाषेचा प्रसार व्हावा.
- मराठी भाषेचे वैभव व समृद्धी वाढावी.
- मराठी भाषेबद्दलची सर्व महाराष्ट्रीयांच्या मनातील अभिमानाची भावना वृद्धिंगत व्हावी.

## मार्गदर्शिकेत काय दिले आहे...

- मराठी भाषा अभिमान सप्ताहात व मराठी भाषा दिनी आपल्याला कोणते कार्यक्रम, उपक्रम योजता येऊ शकतात याची सूची या मार्गदर्शिकेत दिली आहे.
- विविध प्रकारचे महोत्सव, स्पर्धा, प्रदर्शने किंवा भाषाक्षेत्रातील अभिजनांचा सत्कार/गौरव या माध्यमातून 'अभिमान सप्ताह' साजरा केला जावा.
- कोणते महोत्सव; कोणत्या स्पर्धा आणि कशा प्रकारची प्रदर्शने आयोजित करावीत याचाही तपशील सोबत दिला आहे.
- विविध कार्यक्रम / उपक्रम कसे साजरे करावेत याबाबतची संक्षिप्त माहिती दिली आहे.
- मोठ्या फलकांवर किंवा भित्तीपत्रकांवर (पोस्टर्सवर) प्रदर्शित करण्यासाठी मराठी भाषेबद्दलचा अभिमान व्यक्त करणाऱ्या कविता; उतारे;काही ओव्या-चरण...इ. सोबत दिले आहेत. (या कविता-उतारे पत्रकांवर छापून वाटलेही जाऊ शकतात.)
- तसेच प्रदर्शित करण्यासाठी मराठीतील काही निवडक संकेतस्थळांची सूची दिली आहे. (ही सूची पत्रकांवर छापून वाटलीही जाऊ शकते.)

# कार्यक्रम-उपक्रम सूची

## १. सत्कार किंवा गौरव :

१.१ स्थानिक मराठी साहित्यिकांचा गौरव.

१.२ स्थानिक मराठी कलाकारांचा किंवा मराठीला व महाराष्ट्राला उच्च स्थान प्राप्त करून देणाऱ्या कलाकारांचा (अभिनेते, चित्रकार, शिल्पकार, लोककलाकार...) गौरव.

१.३ शाळा-महाविद्यालयात मराठी विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचा-प्राध्यपकांचा सत्कार.

१.४ मराठी भाषेच्या विकासासाठी विशेष कार्य करणाऱ्या भाषातज्ज्ञांचा किंवा चळवळीतील कार्यकर्त्यांचा किंवा पत्रकारांचा सत्कार.

१.५ इयत्ता १० वी , इयत्ता १२वी (कला शाखा), कला शाखा पदवी (बी.ए.मराठी) व पदव्युत्तर पदवी (एम.ए. मराठी) या इयत्तांमधील मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके जाहीर करावीत. ही पारितोषिके संबंधित परीक्षांचे निकाल लागल्यानंतर देण्यात यावीत. इयत्ता १० वी व १२वी च्या यशस्वी विद्यार्थ्यांना १ मे चे (महाराष्ट्र दिन) औचित्य साधून पारितोषिके देता येतील.

(आपण वरीलपैकी एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीचा सत्कार ग्रंथतुला करून वेगळ्या प्रकारे करू शकता.)

## २. प्रदर्शने :

२.१ प्रकाशक व स्थानिक ग्रंथविक्रेते यांच्या सहकार्याने पुस्तक प्रदर्शन योजणे.

(कुसुमाग्रजांचा जन्मदिवस हा मराठी भाषा दिवस असल्याने कुसुमाग्रजांचे साहित्य सवलतीच्या दरात देता येऊ शकेल.)

२.२ सुप्रसिद्ध मराठी साहित्यिकांची समग्र माहिती (त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या सूचीसह) प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकांसमोर मांडणे. ही माहिती आपणास पक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होऊ शकेल. (www.manase.org)

(पुणे येथील गमभन प्रकाशनाच्या वतीने गेली अनेक वर्षे साहित्यिकाचे छायाचित्र व समग्र माहिती अशी दिनदर्शिका प्रसिद्ध करण्यात येते. प्रदर्शनासाठी या दिनदर्शिकेचा आपल्याला निश्चित उपयोग होऊ शकतो.

संपर्कासाठी पत्ता : गमभन प्रकाशन, ३७९ शनिवार पेठ, पुणे-३०,
दूरध्वनी : ०२० - २४४५८१४१, E-mail gamabhanaprakashan@gmail.com)

२.३ सुप्रसिद्ध मराठी कवींच्या उत्तम कवितांचे, विशेषत: मराठी भाषेबद्दलचा अभिमान व्यक्त करणाऱ्या कवितांचे प्रदर्शन आपण भरवू शकता. (सोबत काही कविता दिल्या आहेत.)

२.४ मराठी भाषेबद्दलचा अभिमान व्यक्त करणाऱ्या ओव्या-चरण, उतारे - वाक्ये किंवा कविता मोठ्या फलकांच्या (फ्लेक्स्) माध्यमातून चौकाचौकात प्रदर्शित कराव्यात. (काही कविता, उतारे, वाक्ये सोबत दिली आहेत.)

२.५ मराठी भाषेत माहिती प्रदर्शित करणाऱ्या निवडक संकेतस्थळांची (वेबसाईट) सूची सोबत दिली आहे. तीदेखील आपण प्रदर्शित करू शकता.

## ३ स्पर्धा :

३.१ मराठी भाषा या विषयाशी संबंधित निबंध किंवा वक्तृत्व स्पर्धा.

(मराठी असे आमुची मायबोली, व्यवहारात मराठी भाषेचा वापर, मी महाराष्ट्राचा, महाराष्ट्र माझा, मराठी भाषेचा विकास म्हणजेच महाराष्ट्राचा विकास.... असे विषय आपण देऊ शकता.)

३.२ मराठी काव्य वाचन, गीत गायन स्पर्धा.

३.३ मराठी कविता– पाठांतर स्पर्धा.

३.४ इंग्रजी शब्दासाठी मराठी प्रतिशब्द (उदा. थँक्यू - धन्यवाद), मराठी म्हणी - वाक्प्रचार यांविषयी प्रश्नमंजुषा स्पर्धा. (लेखी किंवा तोंडी)

३.५ मराठी हस्ताक्षर व आरेखन स्पर्धा.

## ४. महोत्सव :

४.१ मराठी चित्रपट महोत्सव.

४.२ मराठी नाटक महोत्सव.

४.३ मराठी लोककला महोत्सव. गोंधळी, शाहीर, कीर्तनकार, वासुदेव, बहुरूपी, वाघ्या–मुरळी, भुत्या, तमाशा कलावंत...इ. अनेक लोककलाकारांना सहभागी करून घ्यावे. (मराठी लोककलांविषयीची माहिति आपणास पक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर - www.manase.org -उपलब्ध आहे. )

## ५. अन्य कार्यक्रम-उपक्रम:

५.१ पक्षाच्या संकेतस्थळाचा www.manase.org - चा विविध मार्गाने प्रचार. (आपल्या पक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर महाराष्ट्राविषयीची समग्र माहिती मराठी व इंग्रजी भाषांमध्ये उपलब्ध आहे.)

५.२ मराठी भाषेशी संबंधित विविध विषयांवर व्याख्यानांचे किंवा चर्चासत्रांचे आयोजन. (चर्चासत्रांमधून मराठी भाषेच्या समृद्धीसाठी समाजातील विविध घटकांची काय जबाबदारी आहे याविषयी चर्चा होऊ शकते.)

५.३ पक्षाच्या स्थानिक शाखेच्या वतीने एखाद्या चांगल्या ग्रंथालयास उत्तम पुस्तके भेट द्यावीत.

५.४ आपल्या शाखेच्या किंवा विभागाच्या वतीने एखाद्या छोट्या ग्रंथालयाचे व अभ्यासिकेचे उद्घाटन यानिमित्ताने आपण करू शकतो.

५.४ मराठीतील उत्कृष्ट ५०-१०० ग्रंथ एकत्र करून त्यांची दिंडी काढावी. (पुस्तकांची पालखीतून मिरवणूक काढावी.)

५.५ शालेय किंवा महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी दहिहंडीप्रमाणे 'पुस्तक हंडीचा' आगळा वेगळा उपक्रम योजावा.

५.६ मराठी पाट्यांसाठी आपण विविध प्रकारच्या दुकानदारांकडे आग्रह धरावा.

५.७ रेल्वे - विमानतळावर मराठीतून उद्घोषणा, उपाहारगृहांमध्ये मराठीतून पदार्थांची सूची (मेन्यू कार्ड), बँकांच्या ए टी एम यंत्रात मराठीतून सूचना, विविध शासकीय व खाजगी कार्यालयांत मराठीचा वापर.... इत्यादीबाबत आपण संबंधित लोकांकडे मराठीचा आग्रह धरावा.

५.८ उत्तम मराठी कविता (काही ओळी) छापलेल्या टी-शर्ट्सची विक्री किंवा वाटप आपण करू शकता.

## उपक्रम-कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूचना :

- आपण योजत असलेल्या कार्यक्रमांची पूर्वकल्पना पक्षाच्या संबंधित उच्च पदाधिकाऱ्यांना द्यावी.

- कार्यक्रम-उपक्रमांची जोरदार प्रसिद्धी स्थानिक वृत्तपत्रे व स्थानिक केबल वाहिन्या व पत्रके-भित्तीपत्रके या माध्यमांतून करावी.

- कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी-शिक्षक-प्राध्यापक यांचे सहकार्य घ्यावे. तसेच स्थानिक भाषा-अभ्यासक, भाषातज्ज्ञ, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक यांचे मार्गदर्शन घ्यावे.

- वर दिलेल्या स्पर्धांमधील यशस्वी स्पर्धकांना उत्तम मराठी पुस्तके भेट द्यावीत.

- स्पर्धा किंवा अन्य कार्यक्रमांमध्ये इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

- कविता, उतारे प्रदर्शित करताना मराठी व्याकरण व शुद्धलेखनाची काळजी घ्यावी.

- या मार्गदर्शिकेत निवडक कार्यक्रम-उपक्रमांची सूची दिली आहे. आपणास याहीपेक्षा वेगळी कल्पना सुचल्यास, तशा प्रकारे कार्यक्रम(पदाधिकाऱ्यांच्या परवानगीने) योजावा. तसेच वरील सर्वच कार्यक्रम-उपक्रम एकाच वेळी योजणे अपेक्षित नाही. उपलब्ध वेळ, साधनसामग्री व मनुष्यबळ यांचा विचार करून अधिकाधिक कार्यक्रम उच्च दर्जासह व दिमाखात साजरे करावेत.

- २७ फेब्रुवारी ते ९ मार्च या काळात आपल्याला सदस्य नोंदणीही मोठ्या संख्येने करायची आहे आणि सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र दिन १ मे देखील आपल्याला तेवढ्याच दिमाखात, भव्यतेने साजरा करायचा आहे. या गोष्टी ध्यानात ठेवून कार्यक्रम योजावेत.

- प्रत्येक कार्यक्रमाच्या ठिकाणी पक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाचा www.manase.org - चा उल्लेख (लेखी किंवा तोंडी) आवर्जून करावा.

# मराठी भाषेविषयी
# अभिमान व्यक्त करणाऱ्या
# कविता, उद्‌गार, उतारा व संकेतस्थळांची सूची.

# मऱ्हाटी भाषासुंदरी

**– संत ज्ञानेश्वर**

जैसी दीपांमाझि दिवटी। कां तिर्थीमाझि पूर्णिमा गोमटी।
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी। सर्वोत्तम।।१।।

जैसी सरितांमध्ये गोदावरी। कां पर्वतांमधे रत्नगिरी।
तैसी भाषांमध्ये साजरी। मऱ्हाटी पै।।२।।

हरळांमध्ये रत्नकिळा। कां पुष्पांमध्ये कमळ।
तैसी भाषांमध्ये सोज्वळ। शोभिवंत दिसे।।३।।

दुर्गावरि शोभे चरी। कां मुक्ताफळे शोभती हारी।
तैसी शोभे भाषांमाझारी मऱ्हाटी पैं।।४।।

**तीर्थांमध्ये काशी। व्रतांमध्ये एकादशी।**
**भाषांमध्ये तैशी। मऱ्हाटी शोभिवंत।।५।।**

परिमळांमध्ये कस्तुरी। कां अंबरामध्ये शंबरारी।
तैसी मऱ्हाटी सुंदरी। भाषांमध्ये।।६।।

--*--

## संत ज्ञानेश्वर

**माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेंही पैजांसि जिंके।**
**ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन ।।१।।**

--*--

# स्वातंत्र्यदेवतेची विनवणी

– कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर)

पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करु नका। मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरु नका।।
सूर्यकुलाचा दिव्य वारसा प्रिय पुत्रांनो तुम्हा मिळे। काळोखाचे करून पूजन घुबडांचे व्रत वरु नका।।

अज्ञानाच्या गळ्यात माळा अभिमानाच्या घालु नका। अंध प्रथांच्या कुजट कोटरी दिवाभितासम दडू नका।।
जुनाट पाने गळुन पालवी नवी फुटे हे ध्यानि धरा। एकविसावे शतक समोरी सोळाव्यास्तव रडू नका।।

वेतन खाऊन काम टाळणे हा देशाचा द्रोह असे । करतिल दुसरे बघतिल तिसरे असे सांगुनी सुटू नका।।
जनसेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गुहा। मेजाखालुन मेजावरतुन द्रव्य कुणाचे लुटू नका।।

बोथट पुतळे पथापथावर ही थोरांची विटंबना। कणभर त्यांचा मार्ग अनुसरा वांझ गोडवे गाऊ नका।।
सत्ता तारक सुधा असे पण सुराहि मादक सहज बने। करिन मंदिरी मी मदिरालय अशी प्रतिज्ञा घेउ नका।।

प्रकाश पेरा अपुल्या भवती दिवा दिव्याने पेटतसे। इथे भ्रष्टता तिथे नष्टता शंखच पोकळ फुंकु नका।।
पाप कृपणता पुण्य सदयता संतवाक्य हे सदा स्मरा। भलेपणाचे कार्य उगवता कुठे तयावर भुंकु नका।।

गोरगरिबा छळू नका । पिंड फुकाचे गिळू नका। गुणीजनांवर जळू नका।
उणे कुणाचे दिसता किंचित देत दवंडी फिरु नका। मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरु नका।।

**परभाषेतहि व्हा पारंगत ज्ञानसाधना करा, तरी। माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपु नका।।**
**भाषा मरता देशही मरतो संस्कृतिचाही दिवा विझे। गुलाम भाषिक होऊनि अपुल्या प्रगतीचे शिर कापु नका।।**

कलम करी ये तरी सालभर सण शिमग्याचा ताणु नका। सरस्वतीच्या देवळातले स्तंभ घणाने तोडु नका।।

पुत्र पशूसम विकती ते नर, नर न नराधम गणा तया। परवित्ताचे असे लुटारु नाते त्याशी जोडु नका।।

स्वच्छ साधना करा धनाची बैरागीपण नसे बरे। सदन आपुले करा सुशोभित दुसऱ्याचे पण जाळु नका।।

तरुणाईचे बळ देशाचे जपा वाढवा तरुपरी। करमणुकीच्या गटारगंगा त्यात तयाला क्षाळु नका।।

सुजन असा पण कुजन मातता हत्यार हातामधे धरा। सौजन्याच्या बुरख्याखाली शेपुट घालुन पळू नका।।

करा कायदे परंतु हटवा जहर जातिचे मनातुनी । एकपणाच्या मारुन बाता ऐन घडीला चळू नका।।

समान मानव माना स्त्री तिची अस्मिता खुडू नका। दासी म्हणुनी पिटू नका वा देवी म्हणुनी भजू नका।।

नास्तिक आस्तिक असा कुणीही माणुसकीतच देव पहा। उच्च नीच हा भेद घणास्पद उकिरड्यात त्या कुजू नका।।

माणुस म्हणजे पशू नसे। हे ज्याच्या हृदयात ठसे। नर नारायण तोच असे।

लाख लाख जन माझ्यासाठी जळले मेले विसरु नका। मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरु नका।।

--*--

## मायबोली

– सुरेश भट

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,
जाहलो खरेच धन्य एक तो मराठी.
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी,
एवढ्या जगात माय मानतो मराठी ।।१।।

आमुच्या मनामनात दंगते मराठी,
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी,
आमुच्या नसानसात नाचते मराठी,
आमुच्या रगारगात रंगते मराठी ।।२।।

आमुच्या पिलांपिलांत जन्मते मराठी,
आमुच्या लहानग्यात रांगते मराठी,
आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी, आमुच्या
घराघरात वाढते मराठी ।।३।।

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी.
येथल्या फुलाफुलात हासते मराठी,
येथल्या दिशादिशात दाटते मराठी,
येथल्या नगानगात गर्जते मराठी ।।४।।

येथल्या दरीदरीत हिंडते मराठी,
येथल्या वनावनांत गुंजते मराठी,
येथल्या तरुलतात साजते मराठी,
येथल्या कळीकळीत लाजते मराठी ।।५।।

येथल्या नभामधून वर्षते मराठी,
येथल्या पिकामधून डोलते मराठी,
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी,
येथल्या चराचरात राहते मराठी.।।६।।

**पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी,**
**आपुल्या घरीच हाल सोसते मराठी,**
**हे असे कितीक खेळ पाहते मराठी,**
**शेवटी मदांध तख्त फोडते मराठी.** ।।७।।

--*--

## सरस्वतीच्या वीणेची

**– कल्याण इनामदार**

माझ्या तुक्याचा अभंग

आणि ज्ञानेशाची ओवी

माय मराठी भाषेला

जणू अमनपालवी।।१।।

खेड्यापाड्यात घुमता

एकनाथाचे भारूड

वासुदेवाची पाऊले

होती अंगणाशी जड ।।२।।

नामदेवाची रचना

कुणी घोळता कीर्तनी

होते बोलकी हातात

टाळ-चिपळ्यांची वाणी ।।३।।

जात्यावर दळताना

श्रमपरिहारासाठी

जना, मुक्ताईची गाणी

येती आपोआप ओठी ।।४।।

असे मराठी मातीत सदा सजले अक्षर

सरस्वतीच्या वीणेची इथे लागलेली तार।।५।।

--*--

## आमुची लिपी

**– सोपानदेव चौधरी**

लिपी आमुची नागरी
स्पष्ट उच्चारांचे वर्ण
महाराष्ट्रीयां लाभली
वाणी तैसी ही संपूर्ण।।१।।

नसे उच्चारांची व्याधी
नसे लेखनात अढी
जात धोपट मार्गाने
स्वर-व्यंजनांची जोडी।।२।।

अहो, हिची जोडाक्षरे
तोड नाही त्यांना कुठे
उच्चारातली प्रचीती
जशी ओठांवरी उठे!।।३।।

जैसे लिहू तैसे वाचू
जैसे बोलू तैशा खुणा
जे जे लेखी तेच मुखी
ऐसा मराठीचा बाणा।।४।।

सर्व उच्चारांचे शोधा
शास्त्राज्ञांनो, यंत्र एक
तेच दिसेल तुम्हाला
महाराष्ट्रीयांचे मुख!।।५।।

नाद-ध्वनी उच्चारांना
देत सदा आवाहन
लिपी ऐसी ही प्रभावी
माझ्या भाषेचे वाहन।।६।।

--*--

# पैजा कां जिंके

**– सोपानदेव चौधरी**

अमृताने जिंकीयेल्या
पैजा मराठी बोलाने
असे अमृतामाजीही
बोला, काय आहे उणे?

जैसे मराठी देतसे
मुर्द्यालाही मर्दपण
तैसे अमृताने येते
मर्त्यालागींही जीवन!

अहो मराठीसारखी
अमृताला गोडी आहे
तिच्यासारखे अमर
जगी अमृतही आहे

अमृतास काय उणे?
सांगतसे की कौतिकें
माझी मराठी बोलकी
परी अमृत हे मुके!

--*--

जैसी हरळांमाजी रत्नकिळा!
की रत्नांमाजी हिरा निळा।
तैसी भाषांमाजी चोखळा।
भाषा मराठी।।

**– फादर स्टीफन्स :**

## अस्मिता

– कृष्णचंद्र भोईटे

मानव्याचे गात गीत
भीमाकाठी जमे मेळा
भक्तिभाव पखरण
जनार्दन, चोखामेळा।।१।।

ज्ञानेश्वर, तुकाराम,
जनाबाई ओवीबद्ध
इंद्रायणी ओली गाथा
माझा नाम्या भक्तिबद्ध।।२।।

माझ्या भक्तीचे निधान
'विठ्ठल विठ्ठल' नित्य
अभिषेक करितांना
विटेवरी माझे चित्त।।३।।

माझी मराठी संस्कृती
माझ्या गर्वाचे प्रतीक
माझ्या हर्षाचे पवाडे
इतिहासाचा उद्रेक।।४।।

भीमा, कृष्णा नि गोदेच्या
'मराठी' चा मी मराठा
कृष्णेच्या मातीमधुनी
माझी फुलेल अस्मिता।।५।।

--*--

## माझ्या मराठी बोलांत

राजा यावलीकर (ग. के. जोशी)

माझ्या मराठी बोलांत
आगळीच असे भक्ति
हें विश्वची माझे घर
ज्ञानेशाची खुले उक्ति!१

माझ्या मराठी बोलांत
विवेकाचा नवा रंग
इंद्रायणीलाही जिंकी
तुकयाचा तो अभंग!२

माझ्या मराठी बोलांत
जागे खरा स्वाभिमान
नरसिंह शिवबा तो
बांधी स्वराज्य तोरण!३

माझ्या मराठी बोलांत
नाही जागा अन्यायाला
न्यायासाठी प्राणाहुति
हर हर मंत्र बोला!४

माझ्या मराठी बोलाचे
आज जरी होती हाल
परि उद्यां त्याच्या भाली
यशाचा टिळा पहाल! ५

--*--

## मराठीचा महिमा

– मारुती रामचंद्र मोरे

चिडे मराठी शारदा
चाड ज्याला न कशाची।
झंकारते वीणा हाती
स्तुती गाण्या चांगल्याची।।

भेदाभेद तिने कधी
कोणा कोठे केला नाही।
एका रांजणाचे पाणी
सर्वांसाठी खुले राही।।

माझ्या मराठी भाषेला
गंध केतकीचा येतो।
गुलाबाच्या फुलांतून
रंग गुलाबी मिळतो।।

माय मराठी माऊली
साऱ्या दुनियेची आई।
तिच्या मायाममतेला
कोठे धरबंद नाही।।

आई मराठीचे मन
आहे आकाशाएवढे।
पुण्याईचे सारे काही
मावे असेल तेवढे।।

माझी मराठी मानते
थोर पुरुषांना देव!
पुण्यशील ललनांना
अर्पितसे जीवभाव।।

मीही मराठीचा कवी
गुण आईचे गाईन।
असत्याच्या कारवाया
धुळीला मी मिळवीन।।

--*--

- **१९ व्या शतकातील ब्रिटिश प्रशासक विल्यम हंटर यांचे उद्गार :**

मराठी भाषा ही आर्य कुलातील एक प्रगत अशी भाषा असून, तिच्यात अभ्यासकांना आकर्षित करणारी संरचनात्मक जटिलताही आहे अन् तोच मराठीचा मूळ अस्सल घटक आहे.

- **विविध विचार संग्रह या पुस्तकातील कॉम्रेड डांगे यांचा उतारा. :**

स्वराज्य झाल्यावर भाषेचा प्रश्न आला. स्वराज्यात भाषा कोणती? फारशी की मराठी? प्रश्न आला. शिवाजीने कमिशने नेमली नाहीत! त्याने सांगितले, 'महाराष्ट्राची भाषा मराठी. मराठीचा कर्ता, कर्म, क्रियापद ठेवा, बाकी वाटेल ते जोडा!' 'कर्ता मी मराठी, कर्म माझे, क्रिया माझी, बाकी सर्व तुमचे!' असे सांगून वाद निकालात काढला! मराठी ही राजभाषा केली.

**आज भाषेचा वाद आहे. तो मातृभाषा ठेवूनच सुटेल.** बुद्धाने संस्कृत टाकून जनतेची अर्धमागधी, पाली घेतली. **जनतेची भाषा घेणे हाच वाद सोडविण्याचा मार्ग.**

भाषेचा लढा हा तांत्रिक नसून जीवनाचा लढा आहे. शिवाजीने जनतेची, जीवनाची भाषा घेतली. स्वराज्याबरोबरच स्वभाषा साधली! अशा रीतीने स्वराज्य, स्वराज्याची एकी, स्वराज्याच्या जनतेचे हित व स्वराज्याची भाषा घेऊन शिवाजी मराठी राज्याचा संस्थापक बनला!

(संदर्भ : पृष्ठ ४१, श्रीपाद अमृत डांगे - विविध विचार संग्रह, विचार भारती प्रकाशन, मुंबई.)

--*-

**ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कोकणी साहित्यिक रवींद्र केळेकार यांच्या 'आमोरेर' या निबंधसंग्रहातील 'अमेरिकेच्यान कितें घेवन आयलो?' या निबंधातील भाषेसंबंधीचा परिच्छेद.**

संदर्भ : लोकसत्ता , ५ डिसेंबर २००९.　　　　　　　　अनुवाद : प्रवीण का. शिरगावकर

मी म्हटलं – 'भाषेकडे फक्त संपर्काचं एक साधन – a means of communication म्हणून पाहणं योग्य नाही. **भाषा खरे म्हणजे एक माध्यम, सांस्कृतिक अविष्काराचं –a medium of cultural expression. भाषा माणसाला identity देते.** त्याची त्यालाच आणि जगाला त्याची ओळख करून देते. 'मी पंजाबी, बंगाली, मराठी असले कोणतेच भेदभाव मानत नाही.

मी भारतीय!' असं मी कितीही मोठ्याने आरेडून सांगू दे, 'तू कोंकणी'– असं माझी भाषा मला सांगते आणि 'हा कोंकणी' अशी जगालाही ती माझी ओळख करून देते. **भाषेची identity धर्माच्या identity पेक्षा अधिक तीव्र.** फ्रान्स, इटली आणि स्पेन धर्माच्या दृष्टीनं एक : रोमन कॅथलिक ख्रिस्ती. भाषेच्या दृष्टीनं एकमेकांपासून वेगळे. धर्मामुळे बंगाल प्रांताचा एक तुकडा हिंदुस्थानापासून वेगळा झाला आणि 'पूर्व पाकिस्तान' झाला. भाषेने त्याला पाकिस्तानपासून वेगळा केला आणि त्याचा 'बांगलादेश' केला.

**कुठलंही रोपटं कुठेही नेऊन लावलं म्हणजे ते मूळ धरू शकत नाही. तसेच कुठलीही भाषा कुठेही नेऊन रुजवली, तरी ती तेथे मूळ धरू शकत नाही.** प्रत्यक भाषेची एक भूमी असते आणि ही भूमी माणसाच्या मेंदूत असते. हा मेंदू लाखो वर्षांच्या संस्कारांनी घडलेला असतो. **कोणतीही भाषा लौकिकदृष्ट्या कितीही मागे पडलेली असो, ती बोलणाऱ्याची वाढ त्याच भाषेत योग्य प्रकारे होते.** गोवेकरांचा मेंदू कोंकणी. या मेंदूत इंग्रजी भाषा कधीच मुळं धरु शकणार नाही. ती मरणार नाहीत; परंतु वाढूही शकणार नाहीत. ती भाषा म्हणून कशीबशी तग धरून राहील. फुलणार, फळणार नाही. तिला पाळं असणार नाहीत.

इंग्रजी भाषा 'घेऊन' वाढलेला गोवेकर दिसेल गोवेकरासारखा; परंतु तो गोवेकर असणार नाही. तो 'बोन्साय गोवेकर' असेल. सभा, संमेलनं, परिषदांना शोभा आणण्यापुरताच त्याचा उपयोग होईल. इंग्रजीत लेखन करून नावारूपाला आलेले काही भारतीय लेखक आहेत. खूप रॉयल्टी मिळते त्यांना; परंतु त्यांच्यातील एकाचीही प्रेमचंद, शरच्चंद्र, ताराशंकर बंदोपाध्याय, तघळी विशंकर पिल्ले, वायकम मुहम्मद बशीर, शिवराम कारंथ यांच्या पायापाशी बसण्याची योग्यता नाही. सगळे उपरे. सगळे बोन्साय लेखक, ठेंगणे. त्यांनी स्वत:ला मग कितीही मोठं समजू दे.

अलीकडे बोन्साय गोवेकर खूप पाहायला मिळतात. त्यांना पाहताच माझ्या सर्वांगावर काटा येतो. 'गरीब बापुडे' असेच वाटत राहते. मला गोवेकर हा गोवेकरच राहिलेला पाहिजे. तो गोवेकर कसा दिसला पाहिजे... असलाही पाहिजे. माडाएवढा उंच, मधुर, मधाळ नारळ देणारा.

इंग्रजीची आम्हाला कितीही आवश्यकता असो, ती 'आंतरराष्ट्रीय भाषा' ही का असेना, इंग्रजी घेऊन कुठलाही गोवेकर मोठा होऊ शकणार नाही. Out of place everywhere, at home-nowhere अशी त्याची गत होईल. ठेंगणा कधी धिप्पाड होऊ शकत नाही. **'आंतरराष्ट्रीय' होण्यासाठी आपली भाषा सोडून दिली पाहिजे असे नाही. टॉलस्टॉयने ती सोडली नव्हती. रोमा रोलाँने सोडली नव्हती. रवींद्रनाथांनी सोडली नव्हती.** हे सगळे स्वत:च्या भाषेला मोठं करूनच 'आंतरराष्ट्रीय' झाले. फक्त 'stature' नेच नव्हे, तर विचारानेही. गोवेकर जेव्हा स्वत:बरोबर स्वत:च्या भाषेलाही मोठं करील, तेव्हाच त्याला 'आंतरराष्ट्रीय' आकार प्राप्त होईल.

(वरील उतारा लेखकाने कोकणी भाषेच्या संदर्भात लिहिला आहे. तो मराठी भाषेलाही लागू होतो. )

--**--

# उपयुक्त व माहितीपूर्ण अशा मराठी भाषेतील संकेतस्थळांची सूची

| | |
|---|---|
| **www.manase.org** | www.mnv sena.org |
| www.tukaram.com | www.samarthramdas400.in |
| www.savarkar.org | www.kusumagraj.org |
| www.gadima.com | www.puladeshpande.net |
| www.goneeda.com | www.marathishabda.com |
| www.mymarathi.com | www.raanvata.com |
| mr.upakram.org | www.maharashtra nayak.com |
| www.misalpav.com | www.maayboli.com |
| www.marathiduniya.com | www.thinkmaharashtra.in |
| www.amrutmanthan.wordpress.com | www.marathimati.com |
| www.marathipustake.org | www.maanbindu.com |
| www.manogat.com | www.marathiasmita.org |
| www.amrutmanthan.wordpress.com | www.athavanitil-gani.com |
| www.rasik.com | www.mahanews.gov.in |

वरीलपैकी काही संकेतस्थळांवर मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करणारी माहिती आहे. महाराष्ट्राविषयी सर्वांगीण माहिती (मराठी कविता, गाणी, व्यक्तिचरित्रे, महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, पर्यटन, लोकसंस्कृती...इत्यादी विषयी) मराठी भाषेत उपलब्ध आहे. वरील सूची मोठे फलक (फ्लेक्स्) किंवा भित्तीपत्रके (पोस्टर्स) यांच्या माध्यमातून आपण प्रदर्शित करू शकता. ही सूची आपण वाढवू शकता.

----**----